**श्री.अजयकुमार नष्टे,उपविभागीय अधिकारी, जत उपविभाग जत यांचे न्यायालयात.**

दुरध्वनी क्रं. 02344/246134 Email-sdojath5@gmail.com

क्र.आरटीएस/अपील/३७/२०२४

दिनांक -३१.०१.२०२५

**प्रति,**

१. धोंडिराम लक्ष्मण माळी
२. पांडुरंग लक्ष्मण माळी
३. काशिबाई लक्ष्मण माळी
४. इंदाबाई कैराप्पा माळी
५. शोभा नाथाजी खानापुरे
६. संगिता विजय कोरे

अ.क्र. १ ते ३ रा. छत्रीबाग रोडे जल ता. जत जि. सांगली
अ.क्र. ४ रा. न्यू इंग्लिश स्कूल शेजारी, कवठेएकंद ता. तासगांव जि. सांगली
अ.क्रं. ५ रा. गोठेवाडी रोड, खानापूरे वस्ती तासगांव ता. तासगांव जि. सांगली
अ.क्र. ६ रा. वांढरे चाळ, मिरज ता. मिरज जि. सांगली **..........अपिलार्थी**

**विरुध्द**

१. मल्लाप्पा बंडू माळी
२. चित्राबाई सिद्राम माळी
३. शक्तीप्रसाद सिद्राम माळी
४. शिल्पा यशवंत माळी
५. अंबिका सिध्दाण्णा लंगोटे
६. धानम्मा सागर तेगीमाळी
७. गिरजाबाई गोविंदा माळी
८. सखुबाई मल्लाप्पा माळी
९. वसंत कृष्णा माळी
१०. बसाप्पा कृष्णा माळी
११. श्रीमंत कृष्णा माळी
१२. सविता महादेव माळी

अ.क्र. १ ते ३ व ९ ते 12 रा. छत्रीबाग रोड जत ता.जत जि. सांगली
अ.क्र. ४ व ८ रा. कटरे वस्ती शेगांव रोड जत ता.जत जि. सांगली
अ.क्र. ५ रा. जिरग्याळ ता.जत जि. सांगली
अ.क्र. ६ रा. तेगीमाळी वस्ती, अचकनहळळी ता.जत जि. सांगली
अ.क्र. ७ रा. म्हसोबा मंदिरजवळ, जवळा ता. सांगोला जि. सोलापूर........ जाबदार

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ प्रमाणे**

**निकालपत्र**

मौजे. जत, ता. जत, जि. सांगली येथील सर्व्हे नंबर ५२७, ५२८ या मिळकतीसंदर्भात मंडळ अधिकारी, जत यांनी फेरफार नंबर २५१०९, दिनांक ०३.०६.२०२१ व ४८८७, दिनांक ३०.०८.१९७७, प्रकरणी दिले आदेशावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे आरटीएस अपिल दाखल केलेले आहे.

**प्रस्तुत अपीलकामी उभय पक्षकार यांना म्हणणे मांडणेसाठी रितसर नोटीसा देऊन सुनावणीसाठी पुरेशी संधी देण्यात आली.**

**अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपिलकामी दाखल केलेला अपील मेमो, प्रकरणांतील उपलब्ध कागदपत्रे यांचे एकत्रीत अवलोकन करता माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.**

१. मौजे. जत, ता. जत, जि. सांगली येथील सर्व्हे नंबर ५२७, ५२८ या मिळकतीसंदर्भात मंडळ अधिकारी, जत यांनी फेरफार नंबर २५१०९, दिनांक ०३.०६.२०२१ व ४८८७, दिनांक ३०.०८.१९७७, प्रकरणी दिले आदेशावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे आरटीएस अपिल दाखल केलेले आहे. फेरफार क्र. २५१०९ प्रकरणी अपिल दाखल

करणेस अपिलार्थी यांना जवळपास ०१ वर्षे ७ महिने ०३ दिवस इतका विलंब झालेला आहे. तर फेरफार क्र. ४८८७ प्रकरणी जवळपास ४६ वर्षे ०३ महिने २९ दिवसाचा विलंब झालेला आहे. त्याकामी अपिलार्थी यांनी विलंब माफी अर्ज दाखल केला आहे.

२. त्याअनुषंगाने प्रकरणी दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता, वाद मिळकत बंडू रामा माळी यांनी मृत्यूपत्राने सिद्राया बंडू माळी व जाबदार १ यांना दिलेली असून सदर मृत्यूपत्राची नोंद फेरफार क्रमांक ४८८७ दिनांक ३०.०८.१९७७ रोजी मंजूर झालेली आहे. सिद्राया बंडू माळी यांचे नावाची बोगस मृत्यूपत्राचे आधारे झालेली असलेने त्याआधारे फेरफार क्र.२५१०९ ने झालेली वारस नोंद अपिलार्थी हे रद्द करून मागत आहेत.

३. अपिलार्थी यांना प्रस्तुत अपील दाखल करणेकामी इतका का विलंब झालेला आहे. याबाबत कोणताही कायदेशीर ऊहापोह अथवा कागदोपत्री पुरावा माझे-समोर आणीत नाहीत. त्याचबरोबर मा. उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालय यांनी देणेत आलेल्या वेगवेगळया आदेश प्रकरणी प्रत्येक दिवसागणीक विलंबाबातची कारणे पुराव्यानिशी नमूद करणे क्रमप्राप्त असताना अशी कोणतीही बाब कारण-मिमांसासहीत माझे निदर्शनास आणीत नाहीत. त्यामुळे वरील सर्व उपरोक्त वस्तुस्थीती व दाखल कागदपत्रे यांचा एकत्रीत अवलोकन करता अपिलार्थी यांचे दाखल अपील हे कायदेशीरदृष्टया या न्यायालयात टिकणार नसलेचे दिसून येत आहे. त्यामुळे अपिलार्थी यांचा प्रस्तुत अपील अर्ज हा विलंब माफीच्या मुद्दयावरच फेटाळणे आवश्यक असलेबाबतचे माझे मत झालेने मी, अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी जत, उपविभाग जत पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

**निकालपत्रातील नमुद कारणास्तव प्रस्तुत अपिलार्थी यांचा अपील अर्ज विलंब माफीच्या मुद्दयावर फेटाळणेत येत आहे.**

खर्चासंबंधी कोणतेही आदेश नाहीत.

सदर निकालाची समज सर्व संबंधिताना देणेत यावी.

प्रस्तुत निकालपत्र www.eqjcourts.gov.inया वेबसाईटवर पहाणेस उपलब्ध आहे.

उप विभागीय अधिकारी, जत उपविभाग, जत

**( अजयकुमार नष्टे )**
**उपविभागीय अधिकारी**
**जत उपविभाग जत**

ठिकाण - जत
दिनांक - ३१.०१.२०२५

प्रत -तहसिलदार जत यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.